# भविष्यातील समृद्धीसाठी शाश्वत उद्योग महत्त्वाचे..!

## संस्थापक गौरव पोकळे : आंबिये महाविद्यालयात कन्व्हर्ज २.० अंतर्गत शैक्षणिक उद्योग परिषद उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि.१०** : हरित आणि शाश्वत उद्योग हे केवळ ट्रेंड नाहीत तर उद्याचे भविष्य सुनिश्चित करणारे महत्त्वाचे घटक आहेत. शाश्वत उद्योग असे भविष्य घडवू शकतात, जिथे आर्थिक प्रगती पर्यावरणीय कल्याणासोबतच येते. शाश्वत उद्योग येणाऱ्या पिढ्यांसाठी समृद्धी सुनिश्चित करतात, असे प्रतिपादन इनोव्हॅटिव्हा वेस्ट एड अँड मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक गौरव पोकळे यांनी केले.



**पेडणे : मान्यवर तज्ज्ञांसोबत महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. जुवांव कोस्टा, उपप्राचार्य डॉ. ल्युसी जेम्स, टीआयपी समन्वयक डॉ. मृणाली जांबोटकर व सहभागी विद्यार्थी.**

संत सोहिरोबानाथ आंबिये सरकारी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, विर्नोडा येथील टीआयपी सेल, आयआयसी, उच्च शिक्षण संचालनालय आणि गोवा राज्य उच्च शिक्षण परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कन्व्हर्ज २.० शिक्षण उद्योग संगम, एक शैक्षणिक उद्योग शिखर परिषद २०२५ च्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाच्या सभागृहात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर गृहविज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश पै, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जुवांव कोस्टा, उपप्राचार्य डॉ.ल्युसी जेम्स, टीआयपी समन्वयक डॉ. मृणाली जांबोटकर आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटन सत्रानंतर उद्योग तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यामध्ये कोडेरिक्स सोल्युशन्स एलएलपीचे सीईओ, टेक इनोव्हेटर रोहिर नाईक, सीएसआर बॉक्स ङउंडेशनच्या सीएसआर प्रोग्रामचे वरिष्ठ सहयोगी अनिल ऑगस्टीन, ओपन डेस्टिशन्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद अन्वेकर, व्हायगर मीडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या संस्थापक आणि सीईओ सोनम भगत, गोवा स्टेट इनोव्हेशन कौन्सिलच्या प्रोटोटाईपिंग लॅबमधील रोबोटिक्स आणि थ्रीडी प्रिंटिंगमधील मार्गदर्शक शिवराज सुभाष नाईक, भालचंद्र टेक्नॉलॉजीचे व्यवस्थापकीय संचालक निखिल माळगी आणि गोवा विद्यापीठातील गोवा बिझनेस स्कुलमधील सहायक प्राध्यापक सर्वेश वेळीप यांनी उद्योजकता आणि तंत्रज्ञान या विषयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले.

### विद्यार्थ्यांना घडविले उद्योजक विश्वाचे दर्शन

दुपारच्या सत्रात जीडीपी फाउंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त किशोर शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गटचर्चेत बोधमीचे सहसंस्थापक आणि सीईओ दामोदर पै पाटणेकर, ओपन डेस्टिनेशन्सचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद अन्वेकर, व्यवसाय समुपदेशक ॲश्टन सूझा, निनोष्काचे क्रिएटिव्ह संचालिका निनोष्का आल्वारिस-डेलानी, मीटअप कासा रीगलचे संस्थापक डुबिन्स्की सोरेस यांनी उद्योगविश्वातील आपले स्वत:चे अनुभव विद्यार्थ्यांना सांगून उद्योजक विश्वाचे वेगळे दर्शन घडविले.

### वैशिष्ट्य पूर्ण कार्यशाळा आणि प्रात्यक्षिक

खानापूर येथील व्हिलेज पॉटरी इन्स्टिट्यूटचे शरद कुंभार यांनी मातीकाम आणि त्यातील संधी, तर कोकेडामा कलाकार आणि कृषी प्रात्यक्षिक लीखानी नाईक यांनी वनस्पती नर्सरींच्या व्यवसायातील संधी विद्यार्थ्यांसमोर वैशिष्ट्यपूर्ण कार्यशाळांमधून प्रात्यक्षिकांमधून उलगडून दाखविल्या.

> **विविध उद्योग तज्ज्ञांशी थेट संवाद साधणे, इंटर्नशिप आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांमधून उद्योजक निर्माण करणे यासाठी कन्व्हर्ज २.० शिक्षण उद्योग संगम, एक शैक्षणिक उद्योग शिखर परिषद २०२५ चे आयोजन करण्यात आलेले आहे.**
> **– जुवांव कोस्टा,** प्राचार्य, संत सोहिरोबानाथ आंबिये कला आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय विर्नोडा.

पान १ वरून

### ग्रीन क्रेडिट्स पद्धतीविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

करण्यात आल्या. या नियमांचा उद्देश बाजारपेठ आधारित पर्यावरण संवर्धनाला चालना देण्याचा असला तरी, त्याचा प्रत्यक्ष परिणाम जैवविविधतेवर आणि स्थानिक समुदायांवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात सरकारला खुलासा मागितला असून, पर्यावरण तज्ञ आणि स्थानिक समुदाय या निर्णयाकडे लक्ष ठेवून आहेत. भारतातील पर्यावरणीय धोरणे आणि वनीकरणाच्या धोरणांवर या निर्णयाचा दूरगामी परिणाम होण्याची शक्यता आहे.

### विकास, पायाभूत सुविधा, परकीय गुंतवणुकीवर भर

वाहतूक, बंदर विकास, सिंचन, ऊर्जा, परिवहन आणि दळणवळण क्षेत्रांमध्ये पुढील ५ वर्षांत विक्रमी गुंतवणूक करण्याचे महाराष्ट्र सरकारचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्र सागरी विकास धोरण २०२३ मध्ये बंदर विकासासाठी स्वामीत्वधन, अकृषिक कर, वीज शुल्क, मुद्रांक शुल्क यातून सूट देण्यात आली आहे. वीजेसाठी औद्योगिक दर लागू करण्यात आला आहे. प्रवासी जल वाहतूक आणि किनारी पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रवासी आणि बंदर करातून सूट देण्यात आली आहे, असे अर्थमंत्री पवार यांनी सांगितले. बंदरांच्या करारांचा कमाल कालावधी ९० वर्षे करण्यात आलेला आहे. गेटवे ऑफ इंडिया, मुंबई ते मांडवा, एलिफंटापर्यंत सुरक्षित प्रवासासाठी अत्याधुनिक सुविधायुक्त बोटींसाठी आर्थिक प्रोत्साहन देण्याचं धोरण जाहीर करण्यात आलं आहे. नागपूर मेट्रोचा ४० किलोमीटर लांबीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्यातील ४३.८० किलोमीटर लांबीचं काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी ६ हजार ७०८ कोटी रुपयांचा खर्च येणार आहेत. तसंच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पाला केंद्र शासनानं मान्यता दिली आहे. पुणे मेट्रो रेल्वे टप्पा २ अंतर्गत खडकवासला–स्वारगेट–हडपसर–खराडी आणि नळ स्टॉप–वारजे–माणिकबाग या २ मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किमतीचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या मान्यतेसाठी पाठवण्यात आलेला आहे. कृषी क्षेत्रातील १६ हजार मेगावॅट विजेची मागणी हरित ऊर्जेतून पूर्ण करण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. शेतकऱ्यांना दिवसा विश्वासार्ह वीज पुरवठा करणे शक्य व्हावे, यासाठी २७ जिल्ह्यांमध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मधून २ हजार ७७९ विद्युत उपकेंद्रांसाठी सौर प्रकल्प हाती घेण्यात आले असून ते ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहेत.

**CHANGE OF NAME**

I, **SHABA KUSTA FAL DESSAI** Resident of H No 42/1 Dessai wa-da Caverem Quepem Goa has change my name from **SHABA CUSTA FOLO DESAI** to **SHABA KUSTA FAL DESSAI.** Hereinafter in all my dealings and documents I will be known by new name of as **SHABA KUSTA FAL DESSAI**

**CHANGE IN NAME**

I **ANTHONY MARIO JOSEPH LOBO** R/O HNO 99/1 CHINCH WADA CHIMBEL NORTH GOA HAS CHANGED MY NAME FROM **ANTHONY MARIO LOBO** TO **ANTHONY MARIO JOSEPH LOBO** HEREAFTER IN ALL MY DEALINGS AND DOCUMENTS AND I WILL BE CALLED OR KNOWN BY THE NAME **ANTHONY MARIO JOSEPH LOBO**

**NOTICE**

My Husband **Late Thomas Baptista Pinto** was owning **Maruti Swift Dzire VXI** bearing **Reg. No. GA-06-D-5818.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.
Date: 10.03.2025 Sd/-
**Socorrina Leonor De Melo**
**H. No. 209/A, Dando, Velsao, Cansaulim, South Goa-403712**
Sandeep Ads

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT CAMORLIM SALCETE, GOA
No. VPC/ 2024-25/ 808 Date: 10/03/2025
**CORRIGENDUM**
Ref No: TENDER Notice no VPC/ 2024-25/ 804 dated 5/03/2025 published in Times of India & Dainik herald
In connection to the tender Notice mentioned above the class of contractor in the above referred Notice may be read as PHE/WR/WS & WWD class V & above
All the other terms and conditions given in the above referred tender notice remain unaltered. Sd/- SEAL
(Mr. BasilioFernandes) Sarpanch, V.P. Camorlim, Salcete, Goa.

**CHANGE OF NAME**

I **SAVITA GANESH GUDAGANATTI** w/o HAV GANESH GUDAGANATT, R/o Govt. Md Accn 5TTR, Bambolim Camp & permanent resident of VIII. Godachinamalki, Tq. Gokak, Dist. Belagavi, Karnataka - 591122. I have changed my name from **SAVITA GUDAGANATTI** to **SAVITA GANESH GUDAGANATTI** as per my document. Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **SAVITA GANESH GUDAGANATTI.**

OFFICE OF VILLAGE PANCHAYAT CALANGUTE BARDEZ - GOA
VP/Cal/F-27/24-25/ 5002
Dated : 10/03/2025
**NOTICE INVITING QUOTATION / TENDER**
Sealed Tender / Quotations are invited from eligible Contractors / Suppliers / Dealers for the financial year 2025-26.
**1)** Supply of electrical materials
**2)** Supply of Stationery.
**3)** Collection of market sopo
**4)** Collection of Pay Parking sopo at Tito's lane at Saunta Vaddo
**5)** Collection of Pay Parking sopo near Nazri at Saunta Vaddo, Calangute
**6)** To tow away the two/ four wheeler vehicles parked in the road widening area/No Parking area from Baga to Calangute Association which blocks the access of the public, pedestrians and vehicular traffic.
**7)** To tow away the two/ four wheeler vehicles parked in the road widening area/No Parking area from Calangute Association to Ximer, Gaura Vaddo which blocks the access of the public, pedestrians and vehicular traffic.
The interested contractors should submit the application for the issue of Tender/Quotation form upto **20/03/2025 at 11:00am** on payment of Rs 5,000 towards the cost of the Tender Form (non refundable).
The sealed tender/quotations will be received alongwith Earnest money Deposit on or before **21/03/2025 at 11:00 am** and the tenders / quotations will be opened on **24/03/2025 at 11:00 am** at the V.P. Office.
The Panchayat reserves the right to accept or reject any or all the tenders / quotations without assigning any reason thereof.
Sd/- Seal
( Shri. Joseph R. Sequeira ) Sarpanch, V. P. Calangute

# शैक्षणिक लेखन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समारोप



**साखळी : शैक्षणिक लेखन कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासकप्राच्या सोहळ्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस, समन्वयक हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. सोनिया सिरसाट आणि महाविद्यालयाचे ग्रंथपाल समीर फट्टे व सहभागी विद्यार्थी.**

■ टीम दैनिक हेराल्ड

### साखळी सरकारी महाविद्यालयातील हिंदी आणि ग्रंथालय विभागातर्फे आयोजन

**साखळी, दि. १०** : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळी येथील हिंदी (युजी आणि पिजी), हिंदी संशोधन केंद्र आणि ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक लेखन कौशल्य : योग्य संदर्भ, उद्धरण आणि साहित्यिक चोरी प्रतिबंध या विषयावरील प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. या अभ्यासक्रमासाठी एकूण ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. हिंदी विभागाच्या प्रमुख डॉ. सोनिया सिरसाट आणि महाविद्यालयाचे ग्रंथपाल समीर फट्टे हे या अभ्यासक्रमाचे मुख्य समन्वयक होते. या अभ्यासक्रमांचा समारोप सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांचे मनोगत झाले. पणजी येथील शारदा मंदिर शाळेच्या अध्यापिका अंकिता हळर्णकर, एम.ए.भाग दोनच्या विद्यार्थिनी संध्या शर्मा, एम.ए. हिंदी भाग एकच्या विद्यार्थी प्रवीण बुरंगे यांनी प्रमाणपत्र अभ्यासक्रमाबद्दलची मते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रियंका चव्हाण यांनी केले. तर आभार समीर फट्टे यांनी मानले.

या प्रमाणपत्र अभ्यासक्रमामध्ये गोवा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट साखळीचे ग्रंथपाल डॉ. तकाप्पा आर, डॉन बास्को कॉलेज ऑफ इंजिनियरिंग,ातोर्डा गोवाचे ग्रंथपाल डॉ.ान्सिस्को रोलँड रॉड्रिग्ज दा क्रूझ, नारायण झांट्ये कॉलेज ऑफ कॉमर्सचे ग्रंथपाल डॉ. बाळा मांद्रेकर, विद्याप्रबोधिनी कॉलेज ऑफ कॉमर्स एज्युकेशन, कम्प्युटर अँड मॅनेजमेंट आल्त पर्वरीचे ग्रंथपाल डॉ. नितेश नाईक, कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय साखळीचे ग्रंथपाल समीर फट्टे आदी मान्यवर तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**विद्यार्थी आव्हानांचा मुकाबला सहजपणे करतील : प्राचार्य गावस**

जलदपणे विकसित होत असलेल्या शैक्षणिक जगात संदर्भ आणि पुरावे देऊन प्रभावीपणे लेखन करणे हे एक कौशल्य नाही तर काळाची गरज आहे. ही गरज ओळखून शैक्षणिक लेखन कौशल्ये : योग्य संदर्भ, उद्धरण आणि साहित्यिक चोरी प्रतिबंध या विषयावरील हा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांचे आयोजन केलेले होते. या अभ्यासक्रमामुळे भविष्यातील कोणत्याही आव्हानांचा मुकाबला विद्यार्थी सहजपणे करू, शकतात, असे उद्गार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नामदेव गावस यांनी काढले. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून लेखन विषयक कौशल्ये आत्मसाद करून विद्यार्थी नक्कीच यश मिळवतील असा आत्मविश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**NOTICE**

My Husband **Late Tomas Valentino Pinto** was owning **Honda Activa Scooter** bearing **Reg. No. GA-06-AC-9054.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.
Date: 10.03.2025 Sd/-
**Socorrina Leonor De Melo**
**H. No. 209/A, Dando, Velsao, Cansaulim, South Goa-403712**
Sandeep Ads

**NOTICE**

My Husband **Late Thomas Pinto** was owning **Suzuki Motorcycle** bearing **Reg. No. GA-06-J-9828.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.
Date: 10.03.2025 Sd/-
**Socorrina Leonor De Melo**
**H. No. 209/A, Dando, Velsao, Cansaulim, South Goa-403712**
Sandeep Ads

**BEFORE THE MAMLATDAR / JT. MAMLATDAR OF BARDEZ, GOA**
**Case No. MUT / 99556 / Siolim / 2025**
Deepak Chandrakant Burye, r/o 1197, Baman Vaddo, Siolim, Bardez, Goa .......Applicant
V/s
1. Smita Guruprasad Kudchadkar 2. Siddhant Shravan Dubhashi 3. Ria Kudchadkar alias Ria Siddhant Dubhashi 4. Chandrakant V Burye alias Chandrakant Vaikunth Burye 5. Guruprasad Morto Sinai Kudchadkar 6. Lalita Chandrakant Burye .....Respondents
To, The above named respondents / legal heirs
**PUBLIC NOTICE**
Applicant Deepak Chandrakant Burye, r/o 1197, Baman Vaddo, Siolim, Bardez, Goa has filed application U/S 96 of Goa Land Revenue Code 1968 for Mutation in property bearing Sy. no. 54/46 situated in village Siolim, Taluka Bardez Goa. Applicant has acquired the right over the property by virtue of Order inventory proceeding no. 388/2023/D dated 30/03/2024 passed in the court of the Civil Judge Junior Division at Mapusa Goa. Therefore applicant requested to include his name along with the name of Tr Burye in the occupant column of form I and XIV of above mentioned sy. no., by deleting existing name Chandrakant Vaikunth Burye.
WHEREAS, The notices in Form X was sent to all the interested persons by registered AD., however some of the notices could not be served and returned unserved to the sender with postal remark expired, incomplete address house locked, not known, insufficient address and party out of station Etc.
AND WHEREAS, the aforesaid applicant by application dated: 24/02/2025 has prayed for substitute service by means of displaying on the website of Directorate of Settlement and Land Records, Panaji ( < https:// dslr .goa. gov.in/ Public SubNotice_Mutationaspx>) as per Rule 10 sub rule (2) of Goa Land Revenue (Records of Rights and Register of Cultivators) (Amendment) Rules 2021, as the applicant has submitted that they are not aware about the correct addresses of the respondents/their heirs if any for effecting personal service of the notice and prayed to serve notice by way of displaying on Directorate of Settlement and Land Records website. Whereas I am satisfied that this is a fit case for such a publication.
NOW THEREFORE, all the interested persons are hereby given notice of the said mutation entry and called upon to file their objection if any in the office of Mamtaldar / Jt. Mamlatdar of BARDEZ within fifteen days from the date of displaying of this notice on the DSLR website along with material / documentary evidence on which you rely upon in person or through authorized agent, failing which deem fit action under section 96 of the Goa, Land Revenue Code, 1968 will be taken in your absence.
Given under my hand and seal on this 6th March 2025.
Sd/- **Jenisa Pereira**
Mamlatdar / Jt. Mamltadar cum Certifying Officer BARDEZ
Seal

**IN THE COURT OF THE JOINT MAMLATDAR-II OF PONDA, AT PONDA-GOA**
**Case No: JM-II/Mund/C2/Tal/4/2024**
1) Mr. Prashant Pandharinath Naik 2) Mr. Ulhas Pandharinath Naik Both R/o H. No. 45(1-B) Kasswada, Telaulim, Ponda-Goa .....Applicants
V/S
1) Mr. Laxman R. Bandekar (SD) Through his legal representative 1.a. Mrs. Jyoti Bandekar 1.b. Mrs. Madhavi Abhijit Shetyc 1.c. Abhijit Shetye All Resident of Chicalim, Vasco Goa .....Respondents
**PUBLIC NOTICE**
To
The LR's of Respondents No 1
**WHEREAS** the above named applicants have filed an application in this Court for declaration u/s 8-A of the Goa, Daman and Diu Mundkar (Protection from Eviction) Act, 1975. And application filed by the applicant no. 1 dated 01/03/2025.
**AND WHEREAS** the notice sent to the above mentioned opponents are returned back with the postal remark "Insufficient address". It is reported by the applicant that she is unaware of the present residential addresses of the opponents and their legal heirs and above mentioned addressed is the last known address.
**AND WHEREAS** after considering the case of the applicant, I have come to the conclusion that this is a fit case for publishing the notice in the local newspaper.
**Therefore,** notice is hereby given to the above mentioned opponents to appear in this Court on 10/04/2025 at 3.00 p.m. along with material evidence on which they wish to rely upon in person or through duly authorized agent failing which ex- parte order shall be passed and the matter will be decided in his absence.
Given under my hand and the seal of this Court dated this 10th day March, 2025.
Sd/- **(Rosario Carvalho)**
Jt. Mamlatdar-II of Ponda
Ponda Goa
SEAL

# होंड्यात त्रिसूत्री ज्ञानेश्वरी वर परिसंवाद रंगला

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. १०** : गोवा मराठी अकादमी सत्तरी तालुका प्रभाग व होंडा सांस्कृतिक केंद्राच्या सहकार्याने श्री आजोबा देवस्थान प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या संत साहित्य संमेलनात त्रिसूत्री ज्ञानेश्वरी या विषयावर प्रा.डॉ.स्नेहा सुवास प्रभू महांबरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेला परिसंवाद रंगला. शिक्षक तथा कीर्तनकार,नाट्य कलाकार ह.भ.प.गुरुदास सुतार आणि कीर्तनकार ह.भ.प.उदयबुवा फडके यांनी परिसंवादात भाग घेतला. भक्ती,ज्ञान आणि कर्म या सूत्रांनी धरून आपापली मते व्यक्त केली.




यावेळी भक्तीबद्दल बोलताना गुरुदास सुतार म्हणाले, भक्ती हाच आपल्या जीवनाचा पाया आहे.आधुनिक काळात अभ्यास म्हणजे भक्ती. कोणत्याही क्रियेमध्ये भाव असला की ती भक्ती होते. भक्ती हा सर्वांचा दुवा आहे.आपण सदैव भक्ती केली पाहिजे.

ज्ञानावर बोलताना ह.भ.प.उदयबुवा फडके म्हणाले, माहिती विकसित झाली आहे पण ज्ञान विकसित झालेले नाही. समजणे म्हणजे उमजणे नाही. उमजणे म्हणजे ज्ञान होय. नुसते पाठ करणे म्हणजे ज्ञान नव्हे. ज्ञानेश्वरी म्हणजे ज्ञानाची ईश्वरी आहे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात कर्माबद्दल बोलताना प्रा.डॉ. स्नेहा सुवास प्रभू म्हांबरे म्हणाल्या, आपले कर्म काय आहे हे सर्वांनी शोधले पाहिजे.पसायदान हे ज्ञानेश्वरीचे सार आहे. रमेश म्हाऊस्कर,रोहिदास सातार्डेकर व गजानन वांतेकर यांनी मान्यवरांना ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. सूत्रसंचालन प्रेमनाथ गावडे यांनी केले तर सुरेखा नाईक यांनी आभार मानले .

# आंबिये महाविद्यालयाने पटकावले आरंभचे जेतेपद

## प्राचार्य जुवांव कोस्टा यांच्याकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. १०** : कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय खांडोळा आयोजित आरंभ या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेचे विजेतेपद संत सोहिरोबानाथ आंबिये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पटकाविले आणि आरंभच्या चषकावर महाविद्यालयाचे नाव कोरले. या स्पर्धेतील फॅशन शो, मिस्टर आणि मिसेस आरंभ, प्रवेश संचालन, टग ऑफ वॉर, फोटोग्राफी, सरप्राईज इव्हेंट, बॅटल ऑफ बँड्स, मीम या प्रकारांत पहिला क्रमांक पटकावला. तर रील बनविणे, फ्लॅग पेटिंग, अवतार, फेस पेटिंग, क्रिकेट या प्रकारात दुसरा क्रमांक पटकाविला. फुटबॉल, ग्रुप डान्स, बीजीएमआय, डान्स बॅटल या प्रकारांत तिसरा क्रमांक पटकाविला.




**आरंभच्या चषकासह आंबिये महाविद्यालयाचे विद्यार्थी. सोबत मार्गदर्शक डॉ. रंजिता परब आणि प्रा.करुणा जाधव.**

महाविद्यालयातील डॉ. रंजिता परब आणि प्रा.करुणा जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना हे घवघवीत यश प्राप्त झाले. या अगोदरही कोलापसिया चषकावर आंबिये महाविद्यालयाने नाव कोरले होते. त्यावेळीही डॉ. रंजिता परब आणि प्रा.करुणा जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते.

**विद्यार्थ्यांच्या सांघिक कामगिरीचे यश : कोस्टा**

शिक्षकांचे बहुमूल्य मार्गदर्शन, योग्य नियोजन, सराव आणि स्वत:वरील प्रखर आत्मविश्वास यामुळे विद्यार्थ्यांना हे यश मिळाले असून महाविद्यालयाच्या शिरेपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून विद्यार्थ्यांच्या सांघिक कामगिरीमुळे हे यश मिळाले असल्याची प्रतिक्रिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जुवांव कोस्टा यांनी दिली.

# विद्यार्थ्यांनी ज्ञान आणि नाविन्यांचा शोध घ्यावा..!

## व्यवस्थापक प्रमोद कुमार यांचे प्रतिपादन केपे महाविद्यालयात आयओटीवरील कार्यशाळेचा समारोप

टीम दैनिक हेराल्ड

**केपे, दि. १०** : विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी ज्ञान आणि नाविन्यांचा सातत्याने शोध घेतला पाहिजे. या शोधात आयओटी (इंटरनेट ऑफ थिंग्ज) विषयावरील कार्यशाळा महत्त्वाची भूमिका बजावत असतात, असे प्रतिपादन आयईईई इंडियाचे शिक्षण वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद कुमार यांनी केले.

उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी, आदिवासी विकास विभाग आणि आयओटी विभाग कला, विज्ञान आणि वाणिज्य शासकीय महाविद्यालय केपे व सी डॅक बंगळुरू (सीडीएसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयओटी या विषयावरील (इंटरनेट ऑफ थिंग्ज) वर राज्यस्तरीय कार्यशाळेच्या समारोप सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद कुमार बोलत होते.



**केपे: कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी आयईईई इंडियाचे शिक्षण वरिष्ठ व्यवस्थापक प्रमोद कुमार, उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्रवीणा केरकर, कार्यशाळेच्या मुख्य समन्वयक डॉ. कविता असनानी व इतर मान्यवर.**

यावेळी व्यासपीठावर उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावईकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रवीणा केरकर, कार्यशाळेच्या मुख्य समन्वयक डॉ. कविता असनानी, केपे सरकारी महाविद्यालयातील आयओटी सेलच्या समन्वयक प्रा.ऑलिव्हिया सोरेस आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यशाळा समारोप सोहळ्याच्या सुरुवातीला मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यशाळेच्या मुख्य समन्वयक डॉ. कविता असनानी यांनी कार्यशाळेचा अहवाल, आयोजनामागची उद्दिष्टे स्पष्ट केली. यावेळी संचालक भूषण सावईकर, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा केरकर यांचे मनोगत झाले. संगणकशास्त्र आणि भौतिकशास्त्र या विषयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी या कार्यशाळेविषयी मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रा. स्नेहा देसाई यांनी केले. तर आभार प्रा.ऑलिव्हिया सोरेस यांनी मानले.

> **शिक्षण आणि तंत्रज्ञान यांच्या वापरातून सामाजिक विकासास चालना मिळेल. आयओटी विषयावरील कार्यशाळेने शिक्षणातील गुणवत्तेचा दर्जा उंचावण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.**
> **– भूषण सावईकर ,** संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पर्वरी.

> **आयओटी कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थी आणि प्राध्यापक यांची जबाबदारी वाढली असून विद्यार्थ्यांना करियरच्या अनुषंगाने संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरणार आहे**
> **– डॉ. प्रवीणा केरकर,** प्राचार्या, सरकारी महाविद्यालय केपे.

**पाहिजेत**

**Wanted Counter sales boys and sales girls** staying in and around Panjim, Pls. Contact Tel. Nos. 9011937381